# सर्वच आजारांवर होमिओपॅथी सक्षम : डॉ. निकम

## 'पुढारी' व मिशन होमिओपॅथीतर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनात सामना करावा लागणाऱ्या आजारांबरोबरच अनेक दुर्धर आजारांवर यशस्वी उपचारासाठी होमिओपॅथी उपचारपद्धती सक्षम असल्याचे मत डॉ. अमरसिंह निकम यांनी शनिवारी येथे आयोजित व्याख्यानामध्ये व्यक्त केले. कार्यक्रमासाठी गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथे दै. 'पुढारी' व मिशन होमिओपॅथी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील आदित्य होमिओपॅथीक हॉस्पिटलचे डॉ. अमरसिंह निकम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आले होते. 'होमिओपॅथी - एक प्रभावी औषधोपचार' या विषयावर ते बोलत होते. यावेळी दै. 'पुढारी'चे ब्युरो को-ऑर्डिनेटर राजेंद्र मांडवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. होमिओपॅथिक औषध उपचारांसंदर्भात डॉ. निकम यांनी श्रोत्यांशी आपले अनुभव कथन करून विविध प्रश्नांची उत्तरे दिली.

जिनेथिक व पॅथॅलॉजीक औषध उपचार पद्धतीची माहिती देऊन

पुढारी
Tomato 94.3 FM
Ekdum Fresh




**कोल्हापूर : दै. 'पुढारी' व मिशन होमिओपॅथी यांच्यातर्फे आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. अमरसिंह निकम. यावेळी उपस्थित माजी महापौर भिकशेठ पाटील, डॉ. संदीप नेजदार, डॉ. संतोष प्रभू आदी.** (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. निकम म्हणाले, शरीर हे अनमोल आहे. शरिरातील घडणारी सूक्ष्म बिघाडाची नोंदही नैसर्गिकरित्या ठेवली जाते. शरीरातील सर्व प्रकारचे आजार कोणत्याही साईड इफेक्टशिवाय बरे करण्याची क्षमता होमिओपॅथीमध्ये आहे. मात्र, याचा आजच्या वैद्यक शास्त्राला विसर पडत असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक व होमिओपॅथीचे डॉ. संदीप नेजदार, डॉ. संदीप पाटील, माजी महापौर भिकशेठ पाटील, डॉ. संतोष प्रभू, उदय पत्रावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.